■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २८८ ■ रविवार दि.६ जुलै २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 288 ■ Sunday Dt.6 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड शहरातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणाची व्याप्ती वाढली..!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




# नीच औलादीच्या विजय पवारने ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलमध्येही विद्यार्थिनीसोबत अश्लील चाळे केले?

## आरोपी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांच्यावर दुसरा गुन्हा दाखल?

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील उमीकरण संकुलनातील कोचिंग क्लासेसमधील एका अल्पवयीन विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणी शिक्षक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांवर गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणी त्यांना अटक देखील करण्यात आली असून दोन्ही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. दरम्यान दुसऱ्या पालकाने लैंगिक छळाची तक्रार दिल्यानंतर आता शिवाजी नगर पोलिस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल झालाय. त्यामुळे आरोपी पवार आणि खाटोकर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. पालकाच्या तक्रारीवरून बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल झालाय. या प्रकरणाचा पुढील तपास सध्या उपविभागीय पोलीस अधिकारी करत आहेत.





दरम्यान, अल्पवयीन विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी विजय पवार व प्रशांत खाटोकर या दोघांची न्यायालयीन कोठडीत रवानगी झालीय. या दोघांची पोलीस कोठडीची मुदत शनिवारी संपली होती. दरम्यान बीड न्यायालयात दोघांना हजर करण्यात आले होते. या दोघांना यापूर्वी दोन दिवस आणि त्यानंतर पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. अशातच पोलिसांनी या घटनेतील लॅपटॉप, मोबाईल, सीसीटीव्ही फुटेज फॉरेन्सिक लॅबला तपासणीसाठी पाठवले आहे. तसेच ३० पेक्षा अधिक जणांचे जबाब देखील नोंदवले आहेत. शनिवारी प्रशांत खाटोकर व विजय पवार यांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

### राजकीय संदर्भही उघड होणार?

तपासादरम्यान मोबाइलमधील रेकॉर्डिंग, सीडीआर तपासला जाणार आहे. पुरवणी आरोपपत्रात नवीन मुद्दे जोडले जाणार आहेत. राजकीय संदर्भही तपासात उघड होऊ शकतो, असे चाकणकर म्हणाल्या. या प्रकरणात गोपनीयता राखली जाईल आणि संबंधित पालक व विद्यार्थिनीची पोलिस भेट निश्चित केली जाईल. पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी महिला आयोग पूर्ण ताकदीने पाठीशी असल्याचा विश्वास त्यांनी दिला.

### बीडमध्ये बाललैंगिक अत्याचारांचे ७८ गुन्हे

बीडमध्ये शाळा, क्लासेस आणि अगदी घरातही मुली असुरक्षित असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. प्रत्येक दोन दिवसांनी एक बाललैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्याची जिल्ह्यात नोंद होतेय. मागील पाच महिन्यांत बाललैंगिक अत्याचाराचे तब्बल ७८ गुन्हे नोंद झालेत. यातील ४२ गुन्हे अल्पवयीन मुलींवर झालेल्या बलात्काराचे तर ३६ गुन्हे विनयभंगाचे आहेत. धक्कादायक म्हणजे पाच महिन्यांत एकूण बलात्काराच्या घटनांमध्ये ४९ टक्के पीडिता अल्पवयीन आहेत.

### महिला आयोग अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी घेतली पीडित विद्यार्थिनीची भेट!



दुसरीकडे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी बीडमधील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणात पीडित विद्यार्थिनीची पोलीस अधीक्षक कार्यालयात भेट घेतली. यावेळी विद्यार्थिनीची भेट घेऊन चाकणकर यांनी या संपूर्ण प्रकरणाची माहिती प्राप्त केली. बीडमधील घटना गुरु शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारी आहे. २६ जूनला गुन्हा दाखल झाला. फरार होण्यास आरोपींना मदत करण्यात आली आणि २९ जूनला अटक करण्यात आली. मोबाईल, लॅपटॉप, सीसीटीव्ही जप्त करावे, इतर विद्यार्थिनी यांना अशा पद्धतीच्या कृत्याचा सामना करावा लागला असेल तर तक्रारी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## प्राध्यापकाला ३८ लाखांना चुना लावणाऱ्या कुटुंबाविरुद्ध गुन्हा

धारूर । प्रतिनिधी

२ हेक्टर १० आर जमीन नावावर करून देतो, असे म्हणत तब्बल ३८ लाख रुपये घेऊन एका प्राध्यापकाची फसवणूक केल्याची गटना उघडकीस आली आहे. पैसे घेतल्यानंतर जमीन नावावर न करता आरोपी फरार झाले. सरशेवटी सदरील प्राध्यापक यांनी धारूर पोलिसात तक्रार दिल्यानंतर चौघा जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये दोन महिलांचा समावेश आहे. याबाबत अधिक असे की, लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील नंदनवन कॉलनी येथे प्रा. अशोक नामदेव शिंदे हे राहतात. ते एमजीएम कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करतात. त्यांची सासरवाडी ही हिंगणवाडी आहे. अशोक शिंदे यांच्या सासर्याचे मित्र राजाभाऊ सोळंके हे गेल्या दोन वर्षांपूर्वी मुलगा आजारी आहे, उपचारासाठी पैशाची गरज आहे यासाठी शिंदे यांच्याकडे आले. त्यांच्याकडून नगदी २० लाख रुपये घेतले. ते २० लाख रुपये परत देणे अवघड झाल्याने सोळंके यानीं आपली जमीन देतो, असे म्हटले. त्या जमीनीवर आठ लाखांपेक्षा अधिक रुपयांचा बोजा होता.

तो बोजा प्रा. शिंदे यांनी भरला, असे तब्बल ३८ लाख रुपये सोळंके यांनी शिंदे यांच्याकडून उचलले. मात्र जेव्हा रजिस्ट्री करण्याची वेळ आली तेव्हा शंभर रुपयांच्या बॉन्डवर त्यांनी नोटरी केली. त्यानंतर मात्र संबंधित व्यक्ती हा फरार झाला. शेवटी प्रा. शिंदे यांनी दिंद्रुड पोलिसांत या प्रकरणी तक्रार दिली. या तक्रारीवरून राजाभाऊ जालिंदर सोळंके, जालिंदर बबन सोळंके, सुदामती जालिंदर सोळंके आणि संगीता राजाभाऊ सोळंके यांच्या विरोधात गु.र.नं. १६८/२०२५ कलम ४२०, १०९, ५०४, ५०६, ३४ भा.दं.वि.नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पांडुरंगा मुख्यमंत्र्यांच्या डोक्यात जा, त्यांच्या मुखातून कर्जमाफीची तारीख जाहीर कर; बच्चू कडू

पंढरपूर । प्रतिनिधी

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर तसेच दिव्यांगांच्या मागण्यांसाठी गेल्या महिन्यात आठवडाभर अन्नत्याग



आंदोलन केले होते. सरकारच्या आश्वासनानंतर त्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले असले तरी, ते अद्याप आपल्या आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहेत. दरम्यान, आषाढी एकादशीनिमित्त बच्चू कडू यांनी पांडुरंगा मुख्यमंत्र्यांच्या डोक्यात जा, त्यांच्या मुखातून कर्जमाफीची तारीख जाहीर कर, असं साकडं घातलं आहे.

बच्चू कडू म्हणाले की, मी पांडुरंगाला साकडं घालतो की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मनात शेकऱ्यांप्रती चांगला विचार येऊ दे. नेहमी शहरीकरणाचा मुद्दा ते धरतात. जपानच्या तंत्रज्ञानावर शहराचा विकास होतो आणि इकडे पांदण रस्ते शेतकऱ्यांना जाण्यासाठी नाही. त्यामुळे पांडुरंगा मुख्यमंत्र्यांच्या डोक्यात तू जा आणि त्यांच्या कानात कर्जमाफीसंदर्भात सांग. कर्ज माफीची तारीख जाहीर केली पाहिजे.

▶ पान २ वर

## वारी शेवटची ठरली! धाराशिवात वारकऱ्याने आयुष्य संपवले

### पोलिसांच्या मानसिक छळामुळे टोकाचं पाऊल, नातेवाईकांचा आरोप

धाराशिव । प्रतिनिधी

संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळ्यात सहभागी होऊन अवघ्या दोन दिवसांपूर्वीच परतलेल्या धाराशिव चा ४८ वर्षीय वारकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. चोरीच्या गुन्ह्यात अडकलेल्या मुलाला सोडवण्यासाठी पोलिसांनी दिलेल्या त्रासामुळे मानसिक तणावातून वारकरी पित्याने आत्महत्या केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

काकासाहेब खडके असे गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या वारकऱ्याचे नाव आहे. पोलिसांच्या मानसिक छळामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलण्याचा गंभीर आरोप खडके आमच्या नातेवाईकांनी केला. मृत वारकरी काकासाहेब खडके हे दोन दिवसांपूर्वीच संत तुकाराम पालखी सोहळात सहभागी होऊन परत आले होते. त्यामुळे परिसरात त्यांच्या आत्महत्येमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

धाराशिव तालुक्यातील वाघोली गावात ४८ वर्षीय वारकऱ्याने आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काकासाहेब खडके असे मृत वारकऱ्याचे नाव आहे. काकासाहेब यांचा मुलगा धीरज खडके याचा विरोधात सोनसाखळी चोरीचा गुन्हा बार्शी पोलीस ठाण्यात काही दिवसांपूर्वी दाखल केला होता. या प्रकरणात पोलिसांनी धीरजच्या शोधात काकासाहेब खडके यांना ताब्यात घेऊन चौकशीसाठी बोलावलं होतं. चौकशी दरम्यान बार्शी पोलिसांनी केलेल्या मानसिक छळामुळे वारकरी पित्याने आत्महत्या केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. आरोपी मुलाला आम्ही स्वतः तुमच्या स्वाधीन करतो अशी पोलिसांना विनंती करू नये बार्शी पोलिसांनी चौकशीच्या नावाखाली मानसिक छळ करून त्रास दिल्यामुळे वारकरी पित्याने टोकाचे पाऊल उचलले असा आरोप नातेवाईक करत आहेत. काकासाहेब खडके हे नियमित वारीला जात असत. यंदाही ते पंढरपूरची वारी पूर्ण करून दोन दिवसांपूर्वीच गावी परतले होते. मात्र घरी परतल्यानंतर काही दिवसातच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्यामुळे गावात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर कुटुंबीयांनी बार्शी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केली आहे. आत्महत्या पूर्वी कोणतीही चिठ्ठी आढळून आली नसून आत्महत्या मागे नेमकं कारण काय होतं ? याकडे गावकऱ्यांचे लक्ष आहे.

## शाळेच्या विरोधात बातम्या का छापल्या म्हणत संपादक खमरुल इमान यांच्यावर संस्था चालकासह शिक्षकाकडून हल्ला

### सईद बेग, कागजी एकरार विरुध्द शहर पोलिस ठाण्यात एनसी

बीड । प्रतिनिधी

संस्थेच्या शाळांविरुध्द बातम्या का छापल्या? असे म्हणत दै. बीड संघर्षचे संपादक खमरुल इमान यांच्यावर संस्थाचालक सईद मिर्झा बेग व शिक्षक कागजी एकरार यांनी हल्ला केल्याची घटना काल रात्री झमझम कॉलनीतील कौसर चौकात घडली. याप्रकरणी संपादक खमरुल इमान यांच्या तक्रारीवरून संस्थाचालक सईद मिर्झा अन्वर बेग व शिक्षक कागजी एकरार अहेमद असरार अहेमद (दोघे रा. कागदी वेस, बीड) यांच्याविरुध्द शहर पोलिस ठाण्यात एनसी दाखल झाली आहे. दरम्यान संपादकावर झालेल्या हल्ला प्रकरणाचा पत्रकार संघटनांकडून निषेध व्यक्त केला जात असून उद्या सर्व पत्रकार पोलिस अधिक्षकांना भेटणार आहेत.



बीड येथील दै. बीड संघर्षचे संपादक मोहम्मद खमरुल इमान खान जफर खान नाझ हे दि.५ जुन रोजी रात्री सव्वा आकरा वाजण्याच्या सुमारास घरी असतांना त्यांना कागजी एकरार यांनी फोन करून सईदभाई, तुम्हाला बोलणार आहेत, त्यांच्याशी बोला असे म्हणताच खमरुल इमान यांनी मला कोणाशी बोलायचे नाही असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर खमरुल इमान हे घराजवळील कौसर चौक येथून जात असतांना कागजी एकरार यांनी मला आवाज देवून बोलावून घेतले व त्याठिकाणी असलेल्या संस्था चालक सईस मिर्झा अन्वर बेग यांनी माझ्या शाळेच्या विरोधात बीड संघर्ष पेपरमध्ये बातम्या का छापतो असे म्हणत शिवीगाळ करत लाथा–बुक्क्यांनी मारहाण केली. माझ्या शाळेबद्दल माफिनामा छाप असे म्हणत सईद मिर्झा अन्वर बेग व कागजी एकरार यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी संपादक खमरुल इमान यांच्या तक्रारविरुध्द सईद मिर्झा अन्वर बेग व कागजी एकरार या दोघांविरुध्द एनसी दाखल करण्यात आली आहे.

### पीआय बल्लाळ साहेब, संपादकांनी तक्रार देवूनही गुन्हा का दाखल नाही ?

बीड संघर्षचे संपादक खमरुल इमान यांच्यावर बातम्या छापल्याच्या रागातून शिक्षण संस्थाचालकाने हल्ला केला. याप्रकरणात स्वतः संपादकांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. मात्र त्यामध्ये गुन्हा दाखल करण्याच्या ऐवजी शहर पोलिसांनी केवळ एनसी दाखल केली. पीआय बल्लाळ साहेब, हे कोणत्या नियमात बसतं. गुन्हा दाखल करण्याऐवजी एनसी दाखल करून उलट ज्यांनी खमरुल इमान यांना मारहाण केली त्यांनीच खमरुल इमान यांच्याविरुध्द दबाव टाकण्यासाठी एनसी दाखल केली आणि पोलिसांनी सुध्दा ती दाखल करून घेतली. एखाद्याने तक्रार दिल्यानंतर आधी त्या तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल होतो. मात्र शहर ठाण्यात त्याविरुध्द घडलंय ते कोणत्या आधारे ? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. याप्रकरणात खरं तर पोलिसांनी बीड संघर्ष या पेपरचे मागील काही अंक तपासावेत त्यामध्ये संबंधीत शाळेच्या विरुध्द बातम्या आहेत का आणि त्यावरूनच ही मारहाण झाली का? हे तपासून पत्रकार संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करायला पाहिजे होता. मात्र पोलिसांनी यामध्ये बोटचेपी भूमिका का घेतली? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे.

# संस्काराची दिंडी सर्वात न्यारी, शिशुवाटिकेत अवतरली पंढरीचा सारी

अंबाजोगाई | प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या शिशुवाटिकेच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा डोळ्याचे पारणे फेडणारा ठरला हा दिंडी सोहळा व चालत्या भिंतीचा पौराणिक देखावा पाहून अवघे पंढरपूरच शिशुवाटिकेत अवतरल्याचा अनुभव सर्वांनाच आला. टाळकरी व नऊवारी वेशभूषेतील चिमुकले वारकरी आणि संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत नरहरी, संत चोखामेळा, संत तुकाराम आदीसह इतर संत परंपरेतील अनेक संत वारकरी संप्रदायाचा



भगवा ध्वज हातात धरलेले ध्वजधारी टाळकरी मृदंगाच्या तालावर रममाण झालेली चिमुकली बालमंडळी असे अनेक आकर्षण या दिंडी सोहळ्यात दिसले विठुरायाच्या अनेक भक्ती गीतावर शिशुवाटिकेच्या चिमुकल्यांनी ठेका धरला विशेष म्हणजे चालणारी भिंत हा पौराणिक देखावा म्हणजे चिमुकल्यांनी केलेला अद्भुत क्षणच म्हणावा लागेल. यावेळी उपस्थित पालक शिक्षक पदाधिकाऱ्यांनी मोठी दाद दिली आणि ती क्षणचित्रे अनेकांच्या मोबाईल कॅमेऱ्यातून टिपल्या गेले

> खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या प्रगती विभागातील शिशुवाटिकेच्या वतीने चांगल्या पद्धतीने नियोजन करून आषाढी एकादशीच्या परावर भक्तीपरंपरेचे प्रत्यक्ष अनुभूती देण्याचा स्तुत्य उपक्रम यशस्वीपणे राबविला त्यांचे मी अभिनंदन करतो.
> – **शिवाजीराव हेंडगे,** मुख्याध्यापक
>
> पुस्तकी ज्ञानाबरोबर संतांच्या शिकवणीतून जीवनाला योग्य दिशा दाखवण्याचे काम भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या संस्कार केंद्राच्या शिशुवाटिकेपासूनच होते.
> –**वर्षा मुंडे,** विभाग प्रमुख

उपस्थित सर्वजण भक्ती रसात न्हाहून निघाले.

या दिंडी सोहळयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे विभाग प्रमुख वर्षा मुंडे, कल्याणी देशपांडे, मनीषा घोगरे, इतर शिक्षिका, शिक्षक, पालक आदींनी भक्तिमय वातावरणात स्वागत केले. बालवयातच भक्तीचा वारसा जोपासणाऱ्या चिमुकल्यांनी शिस्त भक्ती आणि समर्पण याची दिंडी सोहळयातून दाखविले.

# आषाढी एकादशीनिमित्त जि.प.मा. शाळेत बाल दिंडी उत्साहात साजरी

चौसाळा | प्रतिनिधी

चौसाळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत आषाढी एकादशी एकादशी निमित्त बाल दिंडीचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता पहिली ते पाचवी चे वर्ग शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांनी वेशभूषा केली यामध्ये विठ्ठल रुक्मिणी, वारकरी, वारकरी रिंगण सोहळा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले. ही बालदिंडी गावातून फेरी काढून परत शाळेच्या प्रांगणात आल्यानंतर गोल रिंगण करून ज्ञानोबा तुकाराम विठ्ठल नामाचा गजर करत पावली नाचत या दिंडीचा आनंद विद्यार्थी व शिक्षकांनी घेतला घेतला.



सांस्कृती सण उत्सव व त्यामागचा उद्देश विद्यार्थ्यांना कळवा हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. इयत्ता पहिली ते पाचवी च्या वर्ग शिक्षक वरिष्ठ शिक्षिका श्रीमती शालिनी काकडे, शुभांगी जोशी, अलका गुजर, मोहर जोगदंड, शकुंतला तांबडे, तसेच शाळेतील सहकारी शिक्षक ज्ञानेश्वर मस्के, वैभव शिंदे, संतोष परतापुरे, सुधीर जाधव, उद्धव घोडके, योगानंद गांधले, यांनी सहकार्य केले तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे जिप केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अशोक जाधव, सांस्कृतिक विभाग प्रमुख लक्ष्मण राऊत, महारुद्र झोडगे, सर्व शिक्षक बंधू भगिनी तसेच गावकरी उपस्थित होते.



# आदर्श मित्र मंडळाच्या वतीने फराळाचे आयोजन

बीड | प्रतिनिधी

दिनांक सहा जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी निमित्त कबाड गल्ली येथील मराठा पंच कमिटी आणि आदर्श मित्र मंडळ यांच्या वतीने कबाड गल्ली येथील पुरातन जवळपास शंभर वर्षां पेक्षा हि जुना पंचाचा वाडा आहे.

या वाड्याचे पुनर्बांधणी चे भूमिपूजन करण्यात आले. या भूमिपूजनासाठी सर्व जुने पंचकमिटी त्यांचे सर्व सदस्य व आदर्श मित्र मंडळ कबाड गल्ली तील मंडळाचे सर्व सदस्य या सर्वांनी आज आषाढी वारी निमित्त विठ्ठलाची पूजा करून त्या ठिकाणी ज्येष्ठ लोकांच्या हस्ते कुदळ मारून भूमिपूजन केले. या भूमिपूजनातून पंच कमिटी व मित्रमंडळासाठी दोन मजली बिल्डिंग सभागृह बांधण्याचे ठरले आहे यावेळी गल्लीतील सर्व मार्गदर्शक जेष्ठ व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी सर्वांनी आपापल्या पद्धतीने बांधकामासाठी मदत करण्याचे जाहीर केले व या बैठकीमध्ये एका पंधरा मिनिटात सर्वांच्या सहकार्याने दहा लाख रुपये जमा झाले पंचमंडळाच्या इतिहास असा आहे याच्या वतीने दरवर्षी मुक्ताबाई पालखी बीड शहरात आली असता त्या सर्व वारकऱ्यांची या पंच कमिटी व मंडळ राहण्याची व जेवणाची सर्व सोय करत असतात व त्यासाठी ची पुरातत्त्व बांधकाम पाडून नवीन वास्तू उभारण्याचा सर्वांनी संकल्प केला. यावेळी काबाड गल्ली तील जुने रहिवासी इतर ठिकाणी शाहूनगर कॅनॉल रोड धांडे नगर पांगरी रोड या ठिकाणी विभागलेले सर्व जुने सदस्य यावेळी मिटींगला उपस्थित होते व सर्वांनी एकमुखाने बिल्डिंग एका वर्षात पूर्ण करण्याचा संकल्प हाती घेतला आहे असे प्रसिद्धी पत्रकात म्हण्टले आहे.

# फायर ब्रिगेड व्यक्तिमत्व विजेंद्रसिंह डुलगच यांचा वाढदिवस आर्या सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने साजरा

बीड | प्रतिनिधी

आमचे फायर ब्रिगेड व्यक्तिमत्व असलेले आमचे जेष्ठ मोठे बंधू तथा अखिल भारतीय वाल्मिकी समाजाचे मुंबई प्रदेशचे छत्रपती संभाजी नगर मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष विजेंद्र सिंह डुलगच साहेब उर्फ आमचे भाईजी साहेब यांचा वाढदिवस आज बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील नामांकित असलेल्या आर्या सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने भाईजी यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या वातावरणामध्ये गोरगरीब बेघर वृद्ध माता वृद्ध पिता या अनाथ व्यक्तींना फळ व सायंकाळ चे अन्नदान करण्यात आले.



बीड येथील नवी भाजी मंडई येथील असणाऱ्या जिव्हाळा बेघर या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये साजरा करण्यात आला. गेल्या अनेक वर्षापासून समाजसेवेचा वसा आणि वारसा घेतलेले तसेच सर्व लोकांच्या सुखादुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे व आपल्या लेखणीच्या माध्यमातून अनेक नागरिकांचा समस्या शासन प्रशासन दरबारी न्याय मिळवून देणारे असे विजेंद्र जी सिंह डुलगच यांचा वाढदिवस आज मोठ्या धुमधडाक्यात आर्या सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने साजरा करण्यात आला. या वेळी येथे उपस्थित असलेल्या संस्थापक अध्यक्ष गुरु वाल्मिकी सेवाभावी संस्था व अध्यक्षा महिला आघाडी भारतीय वाल्मिकी समाज व मुख्य संपादिका साप्ताहिक समीकरण वार्ता वृतमान पत्राच्या सौ शारदाताई विजेंद्र सिंह दुलगच तसेच आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोद हातागळे, अविनाश विजेंद्र सिह डुलगच, अमोल जाधव, स्वप्निल हातागळे, आनंद शिंदे, बाळासाहेब मोरे, साहिल डुलगच व पैलवान अविनाश हातागळे, राहुल लाहोट, साप्ताहिक समीकर वार्ता शहर प्रतिनिधी जितेंद्रजी गायकवाड, अभिजीत गायकवाड तसेच आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष करून उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा संपादक साप्ताहिक संघर्ष यात्रा आत्माराम वाहळकर तसेच येथे उपस्थित असलेले लोकशाही संघाचे महाराष्ट्र राज्य मुंबई प्रदेश शाखा बीड जिल्हा संघटक तथा उपसंपादक साप्ताहिक समीकरण वार्ता तथा दैनिक न्याय टाइम्स बीड पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर तसेच जिव्हाळा येथील राजू वंजारे, अभिजीत वैद्य तसेच सर्व येथील वृद्ध लोकांची व माता माऊलींचे अतिशय चांगल्या प्रकारे मनोभावे या अनाथ लोकांची सेवा करणाऱ्या छायाताई तसेच उपस्थित असलेले सर्व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने भाई जी साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. सर्वांच्या वतीने मनस्वी भाई जी यांचा शाल पुष्पगुच्छ हार घालून तसेच सेलिब्रेशन करून वाढदिवस साजरा केला व भाईजी यांना उदंड आयुष्य लाभावे अशी सर्वांच्या वतीने श्री ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात आली.




# हिवरा गोवर्धन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी

सिरसाळा | प्रतिनिधी

परळी तालुका येथील हिवरा व सिरसाळा परिसरातील मोठ्या थाटामाटात जयंती साजरी अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादा गट आणि परळी नगर परिषदेचे माजी नगरसेवक तसेच वृक्ष मित्र चेतनजी सौंदळे सर हे होते. दोघांनीही विद्यार्थ्यांना व्यवस्थित मार्गदर्शन केले. मित्र विश्वनाथराव राठोड यांची बंजारा समाजाच्या सामाजिक संघटनेवर निवड झाल्यामुळे त्यांचा या कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

हिवरा गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये १३० विद्यार्थी असून प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड सप्रेम भेट देण्यात आले तसेच पुढील वर्षापर्यंत हे झाड संगोपन करण्याचा त्यांच्याकडून शब्द घेण्यात आला तसेच पुढील वर्षी वसंतराव नाईक साहेब यांची जयंती साजरी करता वेळेस ज्या ज्या विद्यार्थ्यांनी झाड वाढवले आहे. त्यांनी त्या झाडासोबत सेल्फी काढल्यानंतर त्यांना विशेष बक्षीस देण्याचे मान्यवरांनी जाहीर केले.

# १० जुलैपासून वर्षावासाला सुरुवात

परळी | प्रतिनिधी

परळी शहरातील सुगंध कुटी बुद्ध विहार येथे आज दिनांक ०६/०७/२०२५ रविवारी रोजी दुपारी बारा वाजता सुगंध कुटी बुद्ध विहार येथे येणारा वर्षावास पूज्य भंते धम्मसार तक्षशिला बुद्ध विहार किल्लारी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्याचे आयोजित करण्यात आले.

या निमित्त बैठक घेण्यात आली असून यामध्ये विनोद जगतकर, शंकर साळवे, किरण बनसोडे सोपान ताटे, भारत ताटे, बालाजी जगतकर, प्रताप समिंदर सवळे,



बालासाहेब जगतकर, सिद्धार्थ जगतकर, आनंद जगतकर, संजय जगतकर, अमोल अवचारे, कपील जगतकर, वसंत बनसोडे, संतोष आदोडे, राहुल जगतकर, दीपक जगतकर, राज जगतकर, दिनेश जगतकर, आनंद ताटे यांच्यासह तर बौद्ध बांधव उपस्थित होते. या बैठकीत वर्षावासानिमित्त श्रामनेर शिबिर बाल संस्कार शिबिर यासह विविध धार्मिक कार्यक्रम घेण्याचे ठरले.

# आषाढी एकादशी निमित्त पाडळसिंगी येथे वैष्णवांचा महामेळा

गेवराई | प्रतिनिधी

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशी निमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी दिंडी काढली.



आषाढी एकादशीचे औचित्य साधून इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांना विठ्ठल–रुक्माई बनवण्यात आले होते. विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनी विठ्ठलाचे भजन विद्यालयामध्ये करून पाडळसिंगी गावामध्ये दिंडी काढण्यात आली. विद्यालयातील सर्व विद्यार्थी पांडुरंगाच्या भक्तिमध्ये तल्लीन झाले होते. संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. या विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या दिंडीसाठी एकलिंगेश्वर संस्थान, पाडळसिंगी व विठ्ठलगड संस्थान येथील याच आपल्या विद्यालयात शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे योगदान मिळाले.

या दिंडीत पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

पान १ वरून...

## पांडुरंगा मुख्यमंत्र्यांच्या डोक्यात जा

त्यांच्या मुखातून कर्जमाफीची तारीख जाहीर कर, असे त्यांनी म्हटले.

**हे नामर्दांचे सरकार**

बच्चू कडू पुढे म्हणाले की, सरकार शेतकऱ्यांसाठी कुठे मर्दानगी दाखवत नसून हे नामर्दांचे सरकार आहे. शेतकऱ्यांसाठी ५६ इंचाची छाती दिसली पाहिजे. राम मंदिरात जे भाजपला पुण्य भेटलं. ते यांची सत्ता आल्यानंतर शेतकऱ्यांच्या १२०० आत्महत्येचं पाप कुठे हे फेडणार? त्यांच्या धोरणामुळेच शेतकरी मरत आहेत, असा हल्लाबोल देखील त्यांनी यावेळी केला.

**कर्जमाफीची तारीख निश्चित करा**

जोपर्यंत कर्जमाफीची तारीख निश्चित होत नाही, तोपर्यंत आमचं आंदोलन कायम राहणार आहेत. येत्या दोन ऑक्टोबरला मुंबईत मोठा मोर्चा सुद्धा या विषयावर काढण्यात येणार आहे. ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या वेळेवर भाजपने हिंदी सक्तीचा मुद्दा घेतला हीच तर भाजपची हुशारी आहे, असे देखील बच्चू कडू म्हणाले. दरम्यान, शासनाच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्यामुळे घरावरील सोन्याचे कौल बसवण्यापेक्षा धोरण बदलले तर शेतकरी आत्महत्या करणार नाही. शेतकऱ्यांना कर्ज भरण्यासाठी त्यांना सक्षम करण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.

# एम.टेक पती आणि एम. एससी पत्नी या उच्चशिक्षित दाम्पत्यांने माळरानावर फुलवली फळबाग
# दीड एकर ड्रॅगन फ्रुटचे २० ते २५ टन उत्पादनाचा अंदाज

आष्टी | प्रतिनिधी

तालुक्यातील सोलापुरवाडी येथील हनुमंत यांचे शिक्षण एमटेक आणि त्यांची पत्नी कल्पना गावडे या देखील एमएससी पर्यंत शिकलेल्या आहेत पुणे येथील आयटी पार्क मध्ये दोघेही नोकरीत असताना कोविड–१९ महामारीमुळे त्यांना सोलापूर वाडी या गावी परतावे लागले या तरुण उच्चशिक्षित दाम्पत्यांनी कष्ट आणि नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने खडकाळ माळरानावर शेती समृद्ध केली आहे. दुष्काळी भाग असल्याने कमी पाण्यावर येणारी, या भागातील परिस्थितीला पूरक पिकांवर अभ्यास करुन 'ड्रॅगन फ्रुट', चे यशस्वीपणे पीक घेत आर्थिक मजबुती करण्याचा प्रयत्न केला आहे.

बीड जिल्ह्याच्या सीमेवर सोलापुरवाडी (ता. आष्टी) परिसर डोंगरपट्ट्याचा, दुष्काळी. शेतीही सर्वसाधारण प्रतीची. पाण्याचे कायम दुर्भिक्ष असल्याने सोलापुरवाडी वडिलोपार्जीत पन्नास एकर शेती. मात्र बहुतांश क्षेत्र माळरानाचे. हुलगे, मटकी यासारखी कोरडवाहु पीके घेतली जात. हनमुंत गावी आल्यावर कंपनीचे 'वर्क फॉर्म होम' काम सुरु ठेवले. हे काम करत असतानाच त्यांनी आपल्या उच्चशिक्षणाचा फायदा शेतीसाठीही करायचा निर्णय घेत चार वर्षापूर्वी शेती 'डेव्हलप' करण्याचा निर्णय घेतला.

खडकाळ माळरानाच्या जमीनीचे सपाटीकरण केले. प्रारंभी पाण्याचा प्रश्न भेसावत होता. मात्र येथील सामाजिक कार्यकर्ते शिरीष थोरवे स्वतःकडील पाणी उपलब्ध करुन दिले. त्यानंतर दोन एकरावर शेततलाव, विहीरी, विंधनविहीरी घेऊन पाणी प्रश्नावर मात करत 'ड्रॅगन फ्रुट', आणि सफरचंद लागवडीसारखा वेगळ्या प्रयोगासह संत्रा, सीताफळाचे यशस्वी पीक घेत माळरानावरची शेती समृद्ध केली आहे. टॅक्ट्रर चालवण्यापासून बहुतांश कामे पत्नी कल्पना करतात. त्यांना आई लंकाबाई यांची साथ मिळते. वडीलांचे सतरा वर्षापुर्वी निधन झाले. तेव्हापासून कौटूंबीक जबाबदारी हनुमंत यांच्यावर आहे.

खडकाळ, माळरानाच्या शेतीत पारंपारिक पिके घेण्यापेक्षा फळपिकांत वेगळा प्रयोग करण्याचा विचार करुन हनमुंत गावडे यांनी अभ्यास केला. त्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागातील 'ड्रॅगन फ्रुट' लागवड. तेथील पाणी, माती, तापमान, आणि बाजार व्यवस्थापन , आदीबाबतचा अभ्यास केला. सफरचंद लागवडीसंदर्भात जम्मू–काश्मिरच्या भूज, कच्छ तसेच तेलंगणा भागात जाऊन माहिती घेतली. या सर्व बाबीला वर्षाचा कालावधी गेला. 'ड्रॅगन फ्रुट' आणि सफरचंद लावण्याच्या त्यांनी निर्णय घेतला. चार वर्षापुर्वी फलटण येथून ड्रगन फ्रुटची रोपे आणून लागवड ७ बाय १० आकारात लागवड केली. एका एकरात २४०० रोपे लागली. त्यासाठी फलटण तालुक्यातून रोपे आणूली. एक एकरावर हिमाचल प्रदेशातून एचआरएम ९९, अण्णा व डोअरसेट या वाणांची ४१० रोपे आणून तीन वर्षापुर्वी सफरचंदाची १० बाय १२ आकारावर लागवड केली. सफरचंद लागवडीचा प्रयोग करणारे ते या भागातील पहिले शेतकरी आहेत. शिवाय ३ एकरावर संत्रा, २ एकरावर सिताफळांचीही लागवड केली आहे. यंदा सफरचंदात गव्हाचे आंतरपीक घेतले आहे.



ड्रॅगन फ्रुट', सफरचंदासारखे यशस्वीपणे पीक घेताना हनुमंत गावडे आणि कल्पना गावडे वेगवेगळ्या तंत्राचा वापर करतात. त्यांनी फळझाडांना फवारणी करताना उंच झाडावरील फवारणीसाठी वापरात त्यांनी एचटीपी यंत्राचा वापराला प्राधान्य दिले आहे. या यंत्राला अधिक दाब असल्याने कमी काळात पूर्ण झाड फवारणी करताना कव्हर करता येते. अगदी अर्ध्या तासात एक एकर फवारणी करता येते. स्वतःकडे असलेल्या टॅक्ट्रवर अत्याधूनिक फवारणी यंत्र बसवलेले आहे.

'ड्रॅगन फ्रुट', सफरचंद व अन्य फळझाडांच्या बागेत तणनाशक किंवा खुरपणी करत नाहीत. तणनाशकांमुळे झाडांच्या मुळावर परिणाम होते. त्यामुळे झाडांतील प्रोटीन कमी होते. कळी गळती प्रमाण वाढते. खुरपणी करण्यासाठी अधिक आर्थिक भार होते. त्यामुळे त्याएवजी ग्रास कटरचा वापर करत गवताचा भुगा करतात. त्यामुळे आर्थिक भार कमी होतोच, पण तणाचा भुगा होत असल्याने कंपोस्ट खत तयार होते. त्याचा बागेला अधिक फायदा होत असल्याचा त्यांचा अनुभव आहे.

साधारण फेब्रुवारी ते मे या काळात प्रामुख्याने ड्रॅगन फ्रुटवर उन्हाच्या तीव्रतेचा परिणाम होते. ड्रगन फ्रुटच्या झाडाच्या मुळ्या दोन प्रकारे असतात. त्यातील ७० टक्के मुळ्या जमीनीत असतात तर तीस टक्के मुळ्या हवेत मोकळ्या असतात. त्याना पारंब्या किंवा आऱ्या म्हणतात. मोकळ्या मुळ्या सकाळी–सध्याकाळी हवेतील गारवा शोषून घेतात. शिवाया उन्हाळ्यात अधित तापमान असल्यामुळे पाणी अधिक देण्याचा प्रयत्न करतो. उन्हाळा म्हणून अधिक पाणी दिले तर उन्हाळयातील अधिक तापमानामुळे जमीनीतील मुळ्या आहे ते सगळे पाणी खेचून घेतात. ते झाडाच्या पानात साचते. उष्णतेमुळे पानातील पाणी गरम होते आणि पान सडून गळून पडते. अशाच प्रकारे अनेक ड्रॅगन फ्रुट उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होते. हे होऊ नये म्हणून उन्हाळ्याच्या काळात आठ दिवसातून एका एकराला एक तास, म्हणजे एका झाडाला सोळा लिटर पाणी मोजून देतात. त्यामुळे सण बर्निंगमुळे नुकसान होत नाही. शिवाय क्युलीन आणि सिलीकॉन पावडरची चार महिन्यात दोन ते तीन वेळा झाडावर फवारणी करतात. त्यामुळे झाडाच्या पानावर उष्णतेचा तीव्रता कमी करणारा थर तयार होतो. झाडाची सहजपणे उन्हाच्या तीव्रतेमुळे होणाऱ्या नुकसानापासून सुटका होते.

सेंद्रिय खतांमुळे उत्पादनात मोठी वाढ

पीएम बायोटेक प्रॉडक्टची खते वापरल्यामुळे उत्पादनात मोठी वाढ झाली असून त्यांना सन २०२२ मध्ये ०४ टन २०२३ मध्ये १४ टन आणि यावर्षी २० ते २५ टनापर्यंत उत्पादन होणार आहे. संपूर्ण सेंद्रिय खते वापरल्यामुळे या ड्रॅगन फ्रुटला वाढती मागणी असून त्याची वजन जास्त आहे आणि फळावर चकाकी येत असल्यामुळे किंमत पण जास्त मिळू शकते.

– ड्रॅगनचे फळ मोठे होण्यासाठी झाडांतील खनिजे अधिक असली पाहिजे याबाबत हनुमंत गावडे यांनी अभ्यास केला आहे. त्यासाठी जिबेलिक ॲसिड पाच ग्राम व पोटॅशियम सोलाईट चार किलो हे घटक काढणीच्या आधी आठ दिवस प्रती एकरी ठिबकमधून देतात. साधारण जुन ते नोव्हेंबर असे सहा–सात महिने ड्रॅगन फळाची तोडणी केली जाते. जिबेलिक ॲसिड पाच ग्राम व पोटॅशियम सोलाईट दर तोडणीला एक मात्र देतात.

– 'ड्रॅगन फ्रुट', सफरचंद व अन्य फळझाडांना थेट शेणखत न देता त्याचे कंपोस्ट खत तयार करतात. नोव्हेंबरमध्ये संपुर्ण फळतोडणी झाल्यावर साधारण तीस ते पस्तीस टन शेणखत विकत घेतात. त्यात एनपीके, ऑग्रेनिक कार्बन, ॲमिनो ॲसिड असलेले जैविक खत मिसळतात. त्यानंतर चर घेऊन दहा ट्राली खत घालतात. त्यामुळे झाडांत फळ नसताना टवटवी येते, झाडा ताकदवान बनते. फुलधारणा नसताना शाखीय वाढ मोठे होते. फुल व फळधारणेचे प्रमाण दुहेरी होते. ड्रॅगन फळ अगदी एक किलोपर्यत पोसल्याचा त्यांचा अनुभव आहे.पक्षांपासून व किडमाशीपासून संरक्षण करण्यासाठी सफरचंदाला प्लास्टीक आवरण पिशव्याचा वापर करतात. संपुर्ण सिंचन पद्धतीचा वापर करताना तांत्रिक अभ्यासातून फळबागांना मोजून पाणी, ठिंबकमधूनच खते दिल्याने मोजके आवश्यक पाणी,खते जातात. फळधारणा चांगली होतेच, पण आर्थिक बचतही होत आहे.

– हनमुंत आणि कल्पना गावडे या तरुण उच्चशिक्षित दाम्पत्यांनी माळरानावर ड्रॅगन फ्रुट, सफरचंद यशस्वी केल्यानंतर आता पुन्हा दोन एकरावर लागवड करत आहेत. त्यासाठी लागणारे सिमेंटचे खांबासह अन्य लागणारे साहित्य स्वतः तयार केले आहे. बहुतांश कामे हे दाम्पत्यच करतात. फळ तोडणीच्या व अन्य अधिक गरजेच्या काळात स्थानिक पातळीवरील मजुरांची मदत घेतात.

**थेट विक्री, रोपे निर्मिती**

– 'ड्रॅगन फ्रुट', सफरचंद व अन्य फळांची बाजारातील मागणी, तेथील दराचा आढावा घेऊन स्वतः विक्री करतात. पहिल्यावर्षी सन २०२२ मध्ये ड्रॅगन फ्रुटचे ४ टन तर २०२३ मध्ये टनापर्यत उत्पादन निघाले. साधारणपणे प्रतीकिलोला ११० ते १२० रुपयांपर्यत दर मिळाला. मागणीनुसार नगर, पुणे सुरतला विक्री करतात. सफरचंदांचे दर वर्षाला सात क्विंटलपर्यत उत्पादन निघाले आहे. सफरचंदाला ७५ ते १०० रुपयांपर्यत दर मिळाला आहे. संत्रा, सीताफळाची स्थानिक बाजारात विक्री करतात हनुमंत ड्रॅगन रोपांसाठी लागणाऱ्या कटींग स्टींकचीही दर वर्षाला एकलाखापर्यंत विक्री करतात. प्रती स्टीकला पंचवीस रुपयांचा दर मिळतो. आता ते स्वतःही रोपे तयार करण्याला प्राधान्य देत आहेत.

**दोन एकराचा शेततलाव**

सोलापुरवाडी शिवारात शाश्वत उपलब्धता नसल्याने पाण्याचे तसे कायम दुर्भिक्ष. हनमुंत गावडे यांनी पाणीटंचाईवर मात करण्यासाठी गरजेनुसार २ विहीरी, दोन विंधनविहिरी खोदल्या आहेत. कृषी विभागाच्या मदतीने दोन एकर क्षेत्रात उंचवट्यावर पावणे तीन कोटी लिटर क्षमतेचा शेततलाव केला. शेतलाव उंचवट्यावर असल्याने विना विद्युतपंप थेट पाईपलाईनने पाणी सर्व फळपिकांच्या क्षेत्राला देता येते. शिवाय पाणी उपसा करायची गरज पडली तर वीज उपलब्ध असावी म्हणून सोलर युनीट बसवले आहे. त्यामुळे वीजेच्या खर्चात बचत होत आहे.

**मीच सगळं पाहते....**

उच्चशिक्षित असूनही शेती समृद्ध करण्यासाठी योगदान देणाऱ्या कल्पनाताई गावडे यांचा शेतीबाबतचा आत्मविश्वास भक्कम आहे. त्या म्हणतात, 'शेतीसाठी आम्ही गाव सोडून रहायलाच शेतात आलो. येथूनच आमचे काम चालते. शेतीतल्या सगळ्या बाबी शिकून घेतल्या. फळपिकांच्या बहार धरण्यापासून खत, पाणी आणि इतर बाबीपासून तोडणीपर्यत मीच पाहते. शेतीमशागतीसाठीचा टॅक्टर चालवते. हळु हळु सगळीच शेती 'डेव्हलप' करायची आहे.

# सुभाषराव पवळ ऊर्जादायी व्यक्तिमत्व : आ. विजयसिंह पंडित

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील ऑलिव्ह हॉटेल येथे शनिवार २८ जून २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाषराव पवळ यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडित यांची उपस्थिती होती. सत्कारमूर्ती सुभाषराव सुंदरराव पवळ प्रमुख अतिथी माजी आमदार राजेंद्र जगताप, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोकराव डक, भाजपा युवा नेते शिवराज पवार, बीड जिल्ह्याच्या नेत्या प्रा. सुशीला मोराळे, जेष्ठ विधीज्ञ माजी सरकारी वकील ड.कृष्णाजी पंडित, नारायण गडाचे विश्वस्त बी बी जाधव, ड.महादेव तुपे, उद्योजक नितीनराव तौर, उद्योजक राजेंद्र मनोत, उद्योजक अंगद नवले, प्रगतशील शेतकरी उद्योजक अभिजीतराव भांगे, लोकपत्रकार भागवत तावरे, संस्थाचालक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दीपक घुमरे, संस्थाचालक संभाजी करांडे, संस्थाचालक ड. विश्वनाथ मगर, संस्थाचालक गणेश वाघ, संस्थाचालक उत्तमराव पवार, संस्थाचालक महादेव काळे, संस्थाचालक दिनेशलाला पवार, कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील, प्राचार्य राजकुमार कदम माजी प्राचार्य जालिंदर पैठणे, मुख्याध्यापक राजेंद्र केसभट, मुख्याध्यापक भारत मगर, मुख्याध्यापक संजय गोरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वर्गीय सुंदरराव पवळ यांच्या प्रतिमेचे पूजन दीप प्रज्वलन करण्यात आले. समर्थ विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांनीने सर्व पाहुण्यांचे स्वागत गीताने स्वागत केले. उपस्थित पाहुण्यांचे गौरव सोहळा समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. सत्कारमूर्ती सुभाषराव पवळ यांचा सर्व पाहुण्यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, मानपत्र देऊन सपत्नीक भव्य सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत तांबारे यांनी केले. यावेळी राजकुमार कदम, जालिंदर पैठणे, बी.बी. जाधव, भागवत तावरे, सत्येंद्र पाटील, सुशीला ताई मोराळे यांनी शुभेच्छा व्यक्त करून पुढील वाटचालीस दादांना सदिच्छा दिल्या. माजी आमदार राजेंद्र जगताप यांनी आपल्या शुभेच्छा मनोगतात समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना सुंदरराव आप्पा यांचे स्नेहाचे संबंध तसेच इथून पुढे शैक्षणिक क्षेत्रात नवीन प्रकल्प व उपक्रम हाती घ्यावे असा मौलिक संदेश दिला.

सत्कारमूर्ती सुभाषराव पवळ यांनी उपस्थित सर्व अतिथींचे व उपस्थितांचे शुभेच्छा स्वीकारून आभार मानले. अध्यक्षीय भाषणात आमदार विजयसिंह पंडित यांनी पवळ कुटुंबीय हे आमच्या शिवछत्र परिवाराचा एक पिल्लर आहे सुभाषराव हे खूप ऊर्जादायी व्यक्तिमत्व आहे त्यांच्यामध्ये खूप उत्साह आहे पुढील काळात त्यांनी शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात काम करावे असे मत व्यक्त केले.

आमदार विजयसिंह पंडित यांनी आपल्या जोशपूर्ण भाषणाने उपस्थिताचि मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद मगर यांनी केले. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील सर्व स्तरातील बहुसंख्य लोक उपस्थित होते. सर्व उपस्थितांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम अतिशय उत्साहात व आनंद संपन्न झाला.



## लिटल स्टार प्रायमरी इंग्लिश स्कूल सिरसाळा येथे विश्वनाथ राठोड यांची वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

सिरसाळा । प्रतिनिधी

दिनांक ०३/०६/२०२५ गुरुवार रोजी सिरसाळा येथे लिटल स्टार प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री हरित क्रांतीचे प्रणेते महानायक स्वर्गीय वसंतरावजी नाईक साहेब यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून राष्ट्रसंत रामराव महाराज बंजारा सामाजिक परिवर्तन महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा श्री विश्वनाथ जी राठोड यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी श्री विश्वनाथ राठोड यांनी मार्गदर्शनपर बोलत असताना स्वर्गीय वसंतरावजी नाईक साहेब यांच्या बालपणाच्या शाळेतील आठवणींना उजाळा देत महाविद्यालयीन शैक्षणिक जीवनापासून ते राजकीय जीवनापर्यंतच्या संपूर्ण घडामोडीवर नाईक साहेबांच्या कारकीर्दच्या काळी आठवणींना उजाळा दिला. व नाईक साहेबांनी हरितक्रांती कशाप्रकारे घडून आणली व महाराष्ट्र राज्य हा कशाप्रकारे सुजलम सुफलाम् झालं हे सांगत होते. त्यावेळी उपस्थितीत शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री नामदेवजी गायकवाड, मधुसूदन अण्णा टेकाळे, आयुब भाई सय्यद, व अनिल उजगरे, शाळेतील शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी उपस्थित होते.

## आषाढी एकादशीनिमित्त धाकटी पंढरी श्री क्षेत्र भगवानगडावर उसळली भाविकांची मांदियाळी

भगवानगड । प्रतिनिधी



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान तथा धाकटी पंढरी श्री क्षेत्र भगवानगडावर देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वारकरी संप्रदायामध्ये वर्षातील काही मोजक्या दिवसांना विशेष महत्व आहे. त्यापैकी आषाढी एकादशी म्हणजे साधूसंत आणि भगवान पांडुरंग परमात्मा यांच्या भेटीचा विशेष दिवस मानला जातो. या दिवशी पंढरपूरमध्ये देवाला भेटण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून व संपूर्ण देशभरातून लाखो भाविक पंढरपूरला जातात. देवाच्या भेटीला जाताना वारकरी शेकडो पालख्यांच्या समूहाने पायी चालत व भजन कीर्तन करत मोठया आवडीने भगवंताचे गुण गायन करत जातात.

यामध्ये प्रामुख्याने श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी, श्री संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी, संत मुक्ताबाईंची पालखी, श्री संत सोपानकाका महाराजांची पालखी, श्री संत श्री संत तुकाराम महाराजांची पालखी, श्री संत एकनाथ महाराजांची पालखी, श्री क्षेत्र भगवानगडावरून श्री संत भगवानबाबांची पालखी यांसह इतर अनेक संतांच्या पालख्या पंढरपूरला जातात. परंतु ज्या भाविकांना पंढरपूरला जाणे शक्य होत नाही असे लाखो भाविक दरवर्षी धाकटी पंढरी श्री क्षेत्र भगवानगडावरील विजयी पांडुरंग व वै.श्री संत भगवानबाबांच्या समाधी दर्शनासाठी गडावर येतात. यावर्षीही आषाढी एकादशीनिमित्त लाखो भाविकांनी श्री क्षेत्र भगवानगडावर येऊन आपली श्रद्धा अभिव्यक्त केली. दरवर्षी आषाढी एकादशीच्या फराळाचे अन्नदान भारजवाडी ग्रामस्थ तर कार्तिकी एकादशीच्या फराळाचे अन्नदान घोगस पारगांव ग्रामस्थ करतात. यावर्षी शंभर क्विंटल फराळाचे अन्नदान करण्यात आले.

## काँग्रेस पक्षाच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी सय्यद फारूखभाई यांची सार्थ निवड

कडा । प्रतिनिधी



भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या महासचिव राज्यसभा खा. रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी शुक्रवार दि.४ जूलै रोजी बीड जिल्ह्यातील ११ तालुकाध्यक्षांच्या निवडी जाहीर करुन त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये आष्टी तालुका काँग्रेस अध्यक्षपदाची जबाबदारी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ व निष्ठावंत कार्यकर्ते सय्यद फारूखभाई यांना देण्यात आली.

सय्यद फारूखभाई हे मागील अनेक वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणारे सर्वपरिचित धडाडीचे नेतृत्व असुन मागील कार्यकाळात पक्ष संघटनेसाठी केलेल्या कामाची दखल घेत त्यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी निवड करत नियुक्तीपत्र देण्यात आले. ही निवड सार्थ व सर्व सामान्य कार्यकर्त्यांना बळ देणारी असुन पक्ष संघटन वाढीसाठी महत्वाची ठरणार आहे.

आष्टी तालुक्यातील वाडी वस्ती गाव खेड्यांपर्यंत असलेला प्रत्यक्ष संपर्क तसेच तालुकाभरात सर्वपरिचित व पुर्णवेळ लोकांसाठी उपलब्ध असणाऱ्या सय्यद फारूखभाई सारख्या नेतृत्वामुळे आष्टी तालुका व मतदार संघात काँग्रेस पक्षाला निश्चित बळकटी मिळेल. त्यांच्या निवडीबद्दल त्यांना लोकनेत्या खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे पाटील यांच्यासह विविध पक्ष संघटनेसह अनेक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

प्रामाणिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना काँग्रेस पक्षातच न्याय मिळतोच. सय्यद फारूखभाई भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर झाल्यानंतर बोलताना म्हणाले की, मी मागील अनेक वर्षाच्या कार्यकाळात प्रामाणिकपणे केलेल्या कामाची पावती म्हणुन माझे नेते माजी मंत्री अशोकराव पाटील, खासदार रजनीताई अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी माझ्यावर ज्या विश्वासाने पक्ष संघटन वाढीसाठी आष्टी तालुकाध्यक्ष पदाची अतिशय महत्वाची जबाबदारी दिली त्या विश्वासाला कधीही तडा न जावु देता आष्टी तालुक्यातील सर्व जुन्या नव्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन पक्ष संघटन वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करेल, त्याच बरोबर आगामी काळात होऊ घातलेल्या सर्व जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका देखील आम्ही ताकतीने लढू आणि जिंकू असे काँग्रेसचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष सय्यद फारूखभाई यांनी सांगितले.

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवार रोजी श्रीनिवास म. जगताप यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील आकरावी पुण्यतिथी आषाढ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. श्रीनिवास महाराज जगताप पालसिगणकर ता.पंढरपूर जि. सोलापूर यांचे गुरुवार दिनांक १० जूलै २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. व पंढरपूरच्या काल्याचे कीर्तन आहे तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी बक्करवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल. व दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत गुरुमंत्र देण्यात येईल.

## श्री व्यंकटेश पब्लिक स्कुलमध्ये आषाढी निमित्त विठ्ठल दिंडीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी




शहरातील आदित्य नगरी भागात असलेल्या श्री व्यंकटेश पब्लिक स्कूलमध्ये आषाढी एकादशी सणानिमित्त विठ्ठल दिंडी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेतील छोट्या बालकांना विठ्ठल रुक्माई ची वेशभूषा केल्याने दिंडीमध्ये सहभागी विद्यार्थी आणि शिक्षक पालकात मोठा उत्साह संचारला होता.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बीड शहरातील आदित्य नगरी भागात असलेल्या श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल मध्ये शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी सणा निमित्त विठ्ठल दिंडी आयोजित करण्यात आली होती. दिंडीच्या सुरूवातीला प्राचार्य श्री आर.एम. हावळे सर आणि प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक एस.एस. धुमाळ सर यांच्या हस्ते विठ्ठलाची महापूजा करण्यात आली. त्यानंतर पायी दिंडी सोहळा आदित्य नगरी परिसरातुन मोठ्या उत्साहात करण्यात आली.

या दिंडीत शाळेतील सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनींनी वारकऱ्यांची वेशभूषा परिधान केली होती. या वेळी विठु माऊलीचा जयघोष करत सर्व विद्यार्थी दिंडीत उत्साहाने चालत होते. दिंडीतील सहभागी शाळेतील विद्यार्थ्यांनी माऊली माऊली... विठ्ठल विठ्ठल... या गितावर नृत्य केले. या पायी दिंडीचा समारोप विठ्ठल रखुमाईच्या मंदिरामध्ये करण्यात आला. या दिंडीमध्ये पालकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य च्या बीड शहर संघटक आयुर्वेदिक औषध विकास समितीपदी शेख मंसूर मौलाना यांची निवड झाली. या बदल शुभेच्छा देताना संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष साजेद सलीम, शेख अब्बास व मित्र परिवार.

## शहापूर मजरा जिल्हा परिषद शाळेत विठू नामाचा गजर

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शहापूर मजरा शाळा येथे वारकरी दिंडी काढण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी विठुरायासह वारकऱ्याची वेशभूषा परिधान करून विठ्ठल नामाच्या गजरात हा दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात पार पाडला.

गावातून ज्ञानोबा तुकारामच्या गजरात दिंडी काढण्यात विठू नामाचा जयघोष करण्यात आला. दिंडीच्या मार्गात विद्यार्थ्यांनी पावली, फुगडी खेळत रिंगण घालत मोठ्या उत्साहात दिंडीचा आनंद लुटलात्याच प्रमाणे विठु रायाची नावाचा गजर कानी पडताच गावकऱ्यांनी आपल्या पाल्याला वारकऱ्याच्या वेश भुषात पाहण्यासाठी गर्दी केली. या बाल वारकऱ्याच्या सोबत दिंडी मध्ये सामील होऊन टाळ, मर्दग, आवाजावर ठेका धरत वारीचा आनंद घेतला. यावेळी याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संतोष साबळे, आप्पासाहेब चव्हाण, भारत चव्हाण, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष गाढवे, उपाध्यक्ष नवनाथ शिंदे, सरपंच नवनाथ आळणे, पत्रकार प्रकाश शिंदे, सुनिल आवचार यांची उपस्थिती होती. शिवाय गावातील पालक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी राहुल सोनवणे यांची फेरनिवड झाल्याबद्दल बीड तालुका काँग्रेसच्या वतीने सत्कार करताना तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी.

## बीड जिल्ह्यात काँग्रेसकडून नविन तालुका अध्यक्षांच्या निवडी जाहीर

केज । प्रतिनिधी



बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने सर्वच तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून बीड जिल्हा काँग्रेसने आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून तयारी सुरू केली असल्याचे यावेळी सांगितले. या नियुक्त्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्या सूचनेवरून व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोक पाटील, आदित्य पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, पशुपतीनाथ दांगट, प्रवीणकुमार शेप, गणेश राऊत आदींच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.

केज तालुका अध्यक्ष पदी प्रविण लक्ष्मण खोडसे, बीड ग्रामीण गणेश आसाराम बजगुडे, परळी वैजनाथ ग्रामीण, अड.प्रकाश बापूराव मुंडे, परळी वैजनाथ शहर, हानिफ करीम सय्यद, अंबेजोगाई ग्रामीण अभिजीत व्यंकटराव लोमटे, आष्टी फारोक मोहम्मद सय्यद, पाटोदा राहुल शाहुराव जाधव, माजलगाव नारायण लक्ष्मण होके पाटील, धारूर सिध्देश्वर देवराव रणदिवे, गेवराई महेश गणेश बेद्रे, अंबाजोगाई शहर मोहमद असिफोद्दीन सइदोद्दीन खतीब बीड शहर परवेज अहमद बशिरोद्दीन कुरेशी, शिरूर कासार भास्कर बुवासाहेब केदार, माजलगाव शहर अफरोज मुसा तांबोळी, वडवणी ज्ञानेश्वर आबासाहेब आंधळे या प्रमाणे निवडी जाहीर करून नियुक्तीपत्र देण्यात आले. राज्यात काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने आता प्रत्येक पक्ष बांधणी करत असल्याचे दिसत आहे. काँग्रेसने देखील बीड जिल्ह्यात सर्वच तालुका अध्यक्षांच्या व काही ठिकाणी शहर अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.सौ.रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणारा प्रत्येक कार्यकर्ता हा एकनिष्ठ व पक्षाच्या विचारधारेचा आहे. आमच्यावर दिलेली जबाबदारी आम्ही चोखपणे पार पाडू व काँग्रेसला जिल्ह्यात पुन्हा चांगले दिवस आणू असे मत यावेळी सर्वच तालुका अध्यक्ष यांनी बोलताना व्यक्त केले.

यावेळी माजी मंत्री अशोक पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व नव नियुक्त पदाधिकारीयांना शुभेच्छा देऊन पदाचा वापर पक्ष वाढवण्या साठी व पक्षाची भूमिका सर्वसामान्य जनतेला समजावून सांगा. आज ही प्रत्येक गावातील मोठा वर्ग काँग्रेस विचाराचा आहे.आपण त्या लोकांशी संपर्क करा आणि संघटन वाढवा, सर्वसामान्य जनतेच्या कामाला, वेळेला उभे रहा. लोकांचा विश्वास आपल्यावर आहेआपण मोठ्या ताकतीने काम करा व आगामी नगर पालिका, नगर परिषदा, तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती मध्ये आपल्याला उतरायचं आहे त्या अनुषंगाने कामाला लागण्याच्या सूचना देखील यावेळी माजी मंत्री अशोक पाटील यांनी दिल्या.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी देखील सर्व तालुका अध्यक्षांना आप आपली मरगळ झटकून मोठ्याताकतीने येणाऱ्या निवडणुका लढवण्यासाठी कामाला लागण्याचे आदेश दिले तसेच पक्ष संघटनाच्या बाबतीत काहीही अडचण असेल तर आम्हाला कळवा. प्रत्येक कामात जिल्हाध्यक्ष तुमच्या सोबत राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमाला जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## खा.बजरंग सोनवणेंच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी

बीड । प्रतिनिधी



बीडचे खा.बजरंग सोनवणे यांचा वाढदिवस दि.६ जुलै रोजी जिल्हाभरात विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे तालुकास्तरावर राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीरांचे आयोजन केले आहे. दरम्यान, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी ते बारावी पर्यंत विद्यार्थ्यांचीमोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे. खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसा निमित्त बीड जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गतमोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्याबाबत डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रूग्णालय बीड यांनी सर्व वैद्यकिय अधिक्षकांना याबाबत पत्र दिले आहे.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करयात येते.यामध्ये ० ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या बालकांची वर्षातून २ वेळा तर शासकीय आणि निम शासकीय शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटा तील विद्यार्थ्यांची वर्षातून एक दा आरोग्य तपासणी करण्यात येते. दरम्यान, दि.६ जुलैरोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसा निमीत्त संपूर्ण बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाशी संपर्क करण्यात येत असून संबंधीत शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत जन जागृती करावी, असेही डॉ.संजय राऊत, जिल्हा शल्य चिकित्सकजिल्हा रुग्णालय यांनी म्हटले आहे. दरम्यान, यासाठी तालुकास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. वैद्यकिय अधिक्षक, सर्व जिल्हा/उप जिल्हा/ ग्रामिण रुग्णालय यांना पत्र पाठवून आपल्या अधिनस्त आरबीएसके अंतर्गत सर्व वैद्यकिय पथकांना सज्ज ठेवून आरोग्य तपासणी करावी असे आदेश दिले आहेत.

### या कार्यक्रमांचाही समावेश

केज शहर : उपजिल्हा रुग्णालय, केज येथे रुग्णांना साडी वाटप, फळ वाटप, बालाजी मंदिर येथे आरती, दर्गा येथे चादर अर्पण करणे, वयोवृद्ध आश्रम येथे किट वाटप, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, शेतकरी महिलांचा सन्मान असे विविध कार्यक्रम. रक्तदान शिबीर येडेश्वरी कारखाना आनंदगाव सा, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, घाटनांदूर, धारूर, वाघोली, सिरसाळा. इतर सामाजिक उपक्रम : बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात शालेय साहित्य वाटप, फळ वाटप, वृक्षारोपण, फराळाचा कार्यक्रम होणार आहे.

# पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाला देखील गोसावी साहेबांनी दाखवली केराची टोपली

## नेकनूर पोलिसांचा अजब कारभार, घटना घडून दहा दिवस झाले तरी गुन्हा नोंद करून घेण्यास टाळाटाळ

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या शेतमालावर दरोडे टाकायला सुरुवात केली असली तरी गुन्हा नोंद करून घेणं नेकनूरचे ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावींना जीवावर येऊ लागला आहे. सयाजी शिंदे यांचा धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर चौसाळ्यात सात एकर डाळिंब बागेतील २२ टन फळ चोरून नेली. २२ ते २३ लाखाचा हा दरोडा पडून देखील चोरांना अभयदान देण्याचं काम केलं जात आहे. या प्रकरणात दहा दिवस उलटूनही अद्याप गुन्हा नोंद करून घेण्याची गोसावींना गरज वाटली नाही. मग्रुरी इतकी की एस पीं च्या आदेशालाही त्यांनी केराची टोपली दाखवली आहे.



गेल्या दोन महिन्यांपासून चौसाळा बायपास वर किरकोळ वाटमारीच्या अनेक घटना घडल्या असल्या तरी या घटनांची दखल पोलिसांनी घेतली नाही. गुन्हा नोंद केला गेला तर नाहीच नाही उलट तक्रार द्यायला आलेल्या लोकांनाच भीती घालण्याचं काम केलं गेलं. चोरांना मेसाई धार्जीनअशी म्हण प्रचलित आहे. याचाच अपभ्रंश करून चोरांना नेकनुर पोलीस धार्जीन असं म्हटलं जाऊ लागला आहे. चोराना नेकनुर पोलीसाचा आश्रय मिळालेलाच आहे. पण आता शेतकऱ्यांच्या शेतमालावर देखील दरोडा पडू लागला आहे. असं म्हणतात की माकडं लाकडं गोळा करून शेकोटी करतात. या शेकोटीला जाळ नसतो. पण ही लाकडं जळणाला जर वापरली तर ती लाकडं जळत नाहीत. न पेटलेल्या लाकडातली उष्णता शेकोटी भोवती बसलेली माकड शोषून घेतात. त्यामुळे माकडांची लाकडं चुलीला साकडंअशी म्हण देखील प्रचलित आहे. अशीच काहीशी स्थिती नेकनूरचे ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावींनी करून ठेवली आहे. कायद्यातली ऊर्जा ताकत त्यांनी शोषून घेतली. परिणामी जनतेला नेकनूर पोलिसांचं साकडे पडू लागला आहे. हे सांगण्याला कारणही तसंच आहे. चौसाळा बायपास वर सयाजी शिंदे यांची सात एकर डाळिंबाची बाग आहे. उन्हाळ्यात तळहाताच्या फोडाप्रमाणे बाग सांभाळला, टँकरने पाणी आणून झाड जोपासली. उन्हाळ्याची तीव्रता कमी व्हावी यासाठी क्रॉप कव्हर टाकण्यात आले. यावर्षी विक्रमी उत्पादन काढण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. डाळिंबाचं पिक जोमान आलं. बागेतली फळ खरेदी करण्यासाठी व्यापारी चकरा मारू लागले. एवढ्यात चोरट्यांची नजर बागेवर पडली. रात्रीत बागेतली सगळी फळ चोरांनी तोडून नेली. २२ टनाहून अधिकचे डाळिंब फळ चोरून नेले. वीस ते पंचवीस लाखाचे शेतकऱ्याचे नुकसान झाले.

सकाळी ही बाब लक्षात येताच चौसाळा पोलीस चौकीला फिर्याद देण्यासाठी शिंदेंनी धाव घेतली. पोलिसांनी लेखी तक्रार स्वतःकडे ठेवून घेतली. ठाणे प्रमुख गोसावी रजेवर आहेत दोन दिवसानंतर गुन्हा नोंद करण्यात येईल असं सांगण्यात आलं. पण गुन्हा नोंद झालाच नाही. शिंदेंनी नेकनूरच्या चकरा देखील मारल्या. एक दोन टन माल चोरीला गेल्याची तक्रार द्या. एवढी मोठी चोरी झाल्याची तक्रार घेता येत नाही असं स्पष्ट गोसावींनी सांगितलं. तक्रार दाखल करून घेतली जात नाही म्हणून शेवटी सयाजी शिंदे या शेतकऱ्याने पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे धाव घेतली. एसपी समोर त्यांनी कैफियत मांडली. एस पींनी याची दखल घेत तात्काळ गुन्हा नोंद करून घेण्यात यावा असा आदेश चंद्रकांत गोसावींना दिला. पण एसपींच्या आदेश मानतील ते गोसावी कसले? हम करे सो कायदा असं म्हणत एसपींच्या आदेशाला देखील त्यांनी सवयीप्रमाणे केराची टोपली दाखवली.

या प्रकरणात नऊ दिवसाचा कालावधी उलटून गेला असला तरी अद्याप गुन्हा नोंद झालाच नाही. चंद्रकांत गोसावींच्या चोरांना अभय देण्याच्या मानसिकतेमुळे त्यांच्या प्रामाणिकपणावरच प्रश्नचिन्ह निर्माण होऊ लागले आहे. वाटमारी करणाऱ्या चोरांना गोसावी कुठपर्यंत अभयदान देणार? एसपींच्या आदेशाला असंच आणखी किती वेळा केराची टोपली दाखविणार? या प्रकरणात पोलिसांनी दखल न घेतल्यामुळे सयाजी शिंदे हे शेतकरी पोलीस आयुक्त, गृहमंत्री यांच्याकडे आता तक्रार करणार आहेत. एस पी नवनीत कावत यांच्या कारकिर्दीलाच काळीमा फासण्याचा काम गोसावी सारखी मंडळी करू लागली आहे. शेतकऱ्यांना पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या कारकिर्दीत तरी न्याय मिळणार का? असा प्रश्न पडू लागला आहे.



## ना. पंकजा मुंडे यांच्या संकल्पनेतील ग्रीन परळीसाठी व्यापाऱ्यांचा पुढाकार

# वैद्यनाथ महाविद्यालय रोडवर वड वृक्षांची लागवड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

पर्यावरण मंत्री व दुग्धविकास मंत्री ना.पंकजा मुंडे व माजी खा.प्रीतम मुंडे यांच्या संकल्पनेतील ग्रीन परळीचे स्वप्न साकार करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा सौ.उमा समशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली परळी शहरात सुरू असलेल्या वृक्ष लागवड मोहिमेत आज परळीतील व्यापारी व जेष्ठ नागरिकांनी आझाद चौक ते वैद्यनाथ महाविद्यालय रस्त्यावर शेकडो वर्षे टिकणाऱ्या वड वृक्षांची लागवड करण्यात आली. परळी शहर पूर्वीसारखे हरित व्हावे व पुढील काळात प्रदूषणाला आळा बसावा यासाठी ना. पंकजा मुंडे यांनी शहरात देशी वाणाचे वृक्ष लागवड कार्यक्रम आखला आहे. या कार्यक्रमात परळीकरांनी सहभागी व्हावे व आपल्या शहराचे वातावरण रम्य रहावे यासाठी भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी विविध क्षेत्रातील कार्यरत परळीकरांना सहभागी करून घेत मोठी वृक्ष लागवड मोहीम सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक ५ जुलै रोजी आझाद चौक ते वैद्यनाथ महाविद्यालय या रस्त्याच्या कडेला वर्षोनुवर्षे जगणाऱ्या वड या वृक्षाची लागवड व्यापारी बांधव व जेष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी व्यापारी व जेष्ठ नागरिकांनी या मोहिमेत उत्साहाने सहभागी होत ना. पंकजा मुंडे यांचे हरित परळी, सुंदर परळी करण्याच्या कार्यक्रमाबद्दल आभार व्यक्त केले.

भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांच्या वाढदिवसानिमित्त यावेळी सत्कार करून वृक्ष लागवड मोहीम सुरू केल्याबद्दल कौतुक करत शुभेच्छा देण्यात आल्या. या मोहिमेत विकासराव डूबे, जुगलकिशोर लोहिया, विठ्ठलअप्पा चौधरी, शांतीलाल जैन, विजय वाकेकर, दासू वाघमारे, चंद्रकांत अप्पा समशेट्टे, महादेवअप्पा फडकरी, अशोकजी कांकरिया, सुभाष नानेकर, महादेव ईटके, बंडू नाना कोरे, अच्युत जोगदंड, अरुण पाठक, सुशील हरंगुळे, दिलीप नेहरकर, श्रीपाद शिंदे, विकास हालगे, प्रशांत कराड, अश्विन मोगरकर तसेच माजी प्र प्राचार्या सौ.चव्हान, सौ.तारावती बंसल, माजी नगरसेविका सौ.अंजली माळी उपस्थित होते.

# ऐतिहासिक कारंजा टॉवरवर प्रथमच झळकले नामफलक

## प्रशासनिक अधिकाऱ्यांना दिली आवश्यक कामांची यादी

बीड । प्रतिनिधी

ऐतिहासिक कारंजा टॉवरवर प्रथमच नामफलक झळकले असून कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी आवश्यक असलेली १२ कामे करा अशी मागणी रमेशराव गंगाधरे आणि एस.एम.युसूफ यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहराची ऐतिहासिक ओळख असलेले कारंजा टॉवर जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषद प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अत्यंत बकाल अवस्थेत गेले आहे.

या ऐतिहासिक वास्तूची दुर्दशा दूर करण्याकरिता तिन्ही जबाबदार अधिकाऱ्यांनी विशेष व जातीने लक्ष घालून १) कारंजा टॉवरचे तुटलेले दार बदलून नवीन दार लावणे, २) बंद पडलेल्या घड्याळी सुरू करणे, ३) इमारतीला आतून बाहेरून रंगरंगोटी करणे, ४) इमारतीवर चारही बाजूने प्रकाश टाकणारे हाय मास्ट दिवे लावणे, ५) जवळील दोन्ही झाडांच्या टॉवर ला चिटकलेल्या फांद्या छाटणे, ६) कारंजा टॉवरच्या चारही बाजूने लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करणे, ७) कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक प्रतिबंधित सक्तीच्या कारवाया करणे, ८) इमारतीच्या पश्चिम आणि उत्तर बाजूच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे, ९) कॉंक्रिटीकरण झाल्यावर पश्चिम व उत्तर बाजूस दक्षिण बाजू सारखे सिमेंटचे बाकडे ठेवणे, १०) उत्तर बाजूस अतिक्रमण व घाण करून लावण्यात येत असलेले हातगाडे हटविणे, ११) पुन्हा अतिक्रमण केल्यास दंडात्मक कारवाई करणे, १२) कारंजा टॉवरची देखभाल आणि सुरक्षेकरिता बीड नगर परिषदे चा प्रत्येकी किमान एक-एक कर्मचारी दिवस-रात्र कायमस्वरूपी नियुक्त करणे ही कामे युद्ध पातळीवर करणे आवश्यक आहे. असे बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासन विभागाचे अधिकारी संभाजी वाघमारे आणि बीड नगर परिषद कार्यालयात उपमुख्याधिकारी सम्राट कदम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.




तसेच या ऐतिहासिक वास्तूसाठी नागरिकांनी पुढे येऊन ५ कामे स्वतः केली आहेत. इथे सिमेंटचे १० बाकडे ठेवले, २ इलेक्ट्रिकल मोटारी लावल्या, रंगबिरंगी लाइट्स लावून सुरू केल्या, पाण्याचे फवारे सुरू केले आणि इतिहासात प्रथमच कारंजा टॉवर लिहिलेले नामफलक ही लावण्यात आले आहे. प्रशासनिक अधिकाऱ्यांना आता फक्त उरलेली १२ कामे करावी लागणार आहेत. ती कामे तिन्ही जबाबदार अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन पूर्ण केली तर या ऐतिहासिक वास्तूचे जतन व संगोपन चांगले होईल. अन्यथा या ऐतिहासिक वास्तुची दुर्दशा दूर करण्याकरिता आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल असा इशाराही ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेश राव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी निवेदनातून दिला आहे.

## शासकीय धान्य गोदामात काम करणाऱ्या हमालांचे गेल्या सहा महिन्यापासून मानधन नाही

# गरीबाचा संसार चालणार कसा, तात्काळ पैसे द्या

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गावागावात सरकारचे धान्य साठविण्यासाठी मोठे मोठे गोदाम निर्माण केलेले आहेत. सदर गोदामातून खेड्यापाड्यातील गावोगावच्या राशन दुकानावर माल पोहोचवण्यासाठी हमाल, मापाडी यात महत्त्वाची भूमिका बजावतात, गोरगरिबाच्या तोंडात सुखाचे दोन घास जावेत म्हणून तळमळ करतात गोदामातून गाडी भरायची आणि पुन्हा ती गाव गावच्या खेड्यात खाली करायची एवढं परिश्रम घेणारी हमाल मापाडी लोक मात्र सध्या उपाशी असल्याचे दिसत आहेत.

गेल्या सहा महिन्यापासून जिल्ह्यातील हमाल मापडी यांना मानधनच दिले गेले नसल्याने गोर गरीबाच्या तोंडात चार घास घालणारे हमाल मापाडी उपाशी राहणे हे बीड जिल्ह्यातील जनतेला कसे योग्य वाटेल हमाल मापाडी संघटनेच्या वतीने अनेक वेळा निवेदन देऊन मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त संभाजीनगर, जिल्हा पुरवठाधिकारी बीड यांच्या समक्ष बैठकाही झाल्या मात्र हमाल बांधवांच्या वाट्याला फक्त आणि फक्त आश्वासनच मिळाले आहेत. हमाल मापाडी करणारे लोक हे काही करोडपती नाहीत गरीबाच्या तोंडात चार घास पोहोचवणारे गरीबच आहेत. मात्र सरकारकडून दुर्लक्षित झालेले गरीब यांचा तरी संसार चालणार कसा नव्यानेच रुजू झालेले बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी या गोर गरिबांच्या आर्थिक विवेचनेकडे लक्ष देऊन प्रश्न मार्गी लावतील अशी अपेक्षा जिल्ह्यातील हमाल मापाडी व्यक्त करत आहेत.

या उपरही सरकारला आणि जिल्हा प्रशासनाला जाग न आल्यामुळे राजकुमार घायाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मुकादम वैजनाथ शिंदे, दशरथ शिंदे, विजय साळवे, पांडुरंग शिंदे, लक्ष्मण होके, गोविंद होके, देविदास होके, राजेभाऊ वाघमारे, ज्योतीराम खामकर, वैभव पारवे सह तालुक्यातील सर्व हमाल दिनांक ३ जुलै २०२५ पासुन काम बंद आंदोलन करत असल्याने अनेक गावात धान्य पोहचवण्यास बाधा पोहचत आहे याची जिल्हा प्रशासणाने दाखल घेऊन हमाल मापडी वर्गाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी ही जनतेतून होत आहे.

# विद्यार्थ्यांनो अभ्यास करा स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपण यशस्वी व्हाल : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नगद नारायण प्लाझा अंबिका चौक पांगरी रोड बीड या ठिकाणी मराठवाडा अभ्यासिकेचा उद्घाटन सोहळा या अभ्यासिकेचे संचालक तथा आदर्श व्यक्तिमत्व केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर तळेकर यांच्या मराठवाडा अभ्यासिकेच्या उद्घघाटन शुभारंभ जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी उपस्थित मान्यवर होते.



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हाधिकारी आपल्या भाषणात म्हणाले आहेत की विद्यार्थ्यांमध्ये जिद्द चिकाटी मेहनत घेऊन आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करा व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती सांगितली यावेळी स्पर्धा परीक्षा करणारे विद्यार्थी पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परमेश्वर तळेकर यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार युवा पत्रकार अंकुश गवळी यांनी केले. यावेळी विद्यार्थी तरुण पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# शिवसेनेच्या वतीने आषाढीनिमित्त आज सोमेश्वर मंदिरात महाप्रसाद



बीड । प्रतिनिधी

भेटी लागी जीवा, लागलीस आस असं म्हणत आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल भक्त मंदिरांमध्ये गर्दी करतात. आषाढीनिमित्त शिवसेनेच्या वतीने सोमेश्वर मंदिर येथे आज दि.६ जून रोजी महाप्रसाद आयोजित केला आहे. याचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे. आषाढीनिमित्त आज दि.६ रोजी शहरातील विविध विठ्ठल मंदिरांमध्ये सकाळपासून भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. शहरातील बार्शी रोडवरील श्री सोमेश्वर मंदिर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सकाळपासून पूजा अर्चा होणार आहे. या ठिकाणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. उद्या रविवारी सकाळी ८ ते दुपारी ३ यावेळेत भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.

# मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ वकील संघटनेच्या सहसचिवपदी आष्टीचे ॲड.निसर्गराज गर्जे यांचा दणदणीत विजयी

बीड । प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ वकील संघटनेच्या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत ॲड.निसर्गराज बाबासाहेब गर्जे यांनी सह सचिव पदावर दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयामुळे वकील वर्गात प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. नुकत्याच पार पडलेल्या मतमोजणीत ॲड. निसर्गराज गर्जे यांना तब्बल ८०६ मतांचा विक्रमी कौल मिळाला, तर त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार अशोक पावसे यांना ४४९ मतांवर समाधान मानावे लागले. ॲड. गर्जे यांनी ३५७ मतांच्या प्रचंड आघाडीने हा विजय संपादन करत, आपली लोकप्रियता आणि



कार्यकर्त्यांवरील मजबूत पकडीची प्रचिती दिली.

आष्टी (जि.बीड) तालुक्यातील पाटसरा या खेड्यागावात जन्म घेतलेले ॲड. गर्जे हे २०१८-१९ पासून औरंगाबाद येथील मुंबई उच्च न्यायालयात वकिलीचा सराव करत आहेत. त्यांचे वडिल ॲड.बाबासाहेब गर्जे हे गेली ४० वर्षापासून ता.आष्टी येथील न्यायालयात वकिली करत आहे. आपल्या विजयानंतर बोलताना ॲड. गर्जे यांनी हा विजय सर्व ज्येष्ठ वकील आणि सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचा आणि विश्वासाचा असल्याचे मत व्यक्त केले. त्यांच्या या विजयाने वकील संघटनेत नवीन ऊर्जा आणि उत्साह संचारला आहे. त्यांच्या निवडीमुळे संघटनेच्या कारभारात अधिक पारदर्शकता आणि वकिलांच्या हिताचे निर्णय घेतले जातील अशी आशा व्यक्त होत आहे. ॲड. गर्जे यांनी निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करतील असा विश्वास मतदारांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या या विजयाबद्दल त्यांचे सासरे सुमंत भांगे (निवृत्त भा.प्र.से.), महादेव भांगे यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# सेल्फी पॉइंट नुसता नावालाच

## लाखो रुपये खर्च केलेला सेल्फी पॉइंट ठरतोय शोभेची वास्तू

गेवराई । प्रतिनिधी

सेल्फी पॉइंट नुसता नावालाच आहे, असं म्हणायला हरकत नाही कारण तिथे जाऊन लोकांना खरंच चांगले सेल्फी काढायला मिळत नाहीत. अनेक ठिकाणी सेल्फी पॉइंट फक्त नावासाठीच असतात, तिथे चांगली जागा नसते किंवा व्यवस्थित प्रकाश नसतो, त्यामुळे चांगले फोटो येत नाहीत अनेक ठिकाणी सेल्फी पॉइंटसाठी पुरेशी जागा नसते. जिथे जास्त लोकं जमु शकतील, अशी जागा नसते. त्यामुळे चांगले फोटो काढायला अडचणी येतात.चांगले फोटो येण्यासाठी योग्य प्रकाशयोजना आवश्यक असते, पण अनेक सेल्फी पॉइंटवर ती नसते. त्यामुळे फोटो व्यवस्थित दिसत नाहीत.

काही सेल्फी पॉइंटवर सजावट व्यवस्थित नसते किंवा ती आकर्षक नसते. त्यामुळे तिथे फोटो काढायला लोकांना जास्त आवडत नाही. सेल्फी पॉइंटची नियमितपणे स्वच्छता आणि देखभाल करणे आवश्यक आहे, पण अनेक ठिकाणी याकडे दुर्लक्ष केले जाते. गेवराईमध्ये जुन्या नगर परिषदेच्या बाजूस लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या सेल्फी



पॉइंट च्या आडोशाला जाऊन काही लोक लघुशंका करतात व त्या ठिकाणी जिथे फक्त फलक लावला आहे, पण तिथे चांगली जागा नाही किंवा सजावट नाही. त्यामुळे लोकांना तिथे फोटो काढायला आवडत नाही आणि ते फक्त नावासाठीच सेल्फी पॉइंट ठरतो. सेल्फी पॉइंटचा उद्देश लोकांना चांगले फोटो काढायला प्रोत्साहन देणे हा असतो. त्यामुळे, सेल्फी पॉइंट तयार करताना जागेची, प्रकाशाची आणि सजावटीची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. मात्र आता पावसाळा सुरू असल्यामुळे तिथे हिरवळ हिरवेगार गवत उगले असुन गेल्या दोन वर्षापासून धुळखात पडलेले हे सेल्फी पॉईंट्स आता नावाला उरला असून गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून ज्या ठिकाणी गरज आहे त्या ठिकाणी निधी न खर्च करता आलेला निधी कुठे वापरावा आणि कुठे नाही हे देखील लक्षात येत नसल्यामुळे नगर विकास खात्याअंतर्गत मिळणारा कोट्यवधी रुपयांचा निधी नगर परिषदेच्या आडमुठ्या धोरणामुळे आज लाखो रुपये वाया जात आहेत अशी चर्चा रंगू लागली आहे.

गेल्या दोन वर्षापासून उभारलेल्या सेल्फी पॉईंटच्या परिसरात असलेले पोलीस क्वार्टर या ठिकाणी कंपाउंड वॉल बाजूस पडलेल्या भिंती व सेल्फी पॉइंट्सचा आडोसा घेऊन अनेक लोक त्या ठिकाणी लघुशंका करतात ते अतिशय खेदजनक आहे त्यामुळे एवढा मोठा निधी खर्च करून हा सेल्फी पॉईंट धुळखात पडल्याने याकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष पाहायला मिळते मात्र स्वच्छता विभागाच्या वतीने तेथील स्वच्छता मोहीम हाती घेऊन स्वच्छता यशस्वीपणे राबवली पाहिजे असे मत नागरिकांनी व्यक्त केले. गजेच्या ठिकाणी उपलब्ध निधीचा वापर न केल्यामुळे नगरपरिषद यांनी कामाच्या हलगर्जीपणाचा कळस गाठला आहे यावर तात्काळ लक्ष्य घालावे अशी मागणी होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT